जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७१४ दिनांक - २१/०९/२०२३**

सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखा पुणे शहर

## पुणे शहरातील महिलांना आखाती देशात पाठवुन त्यांची फसवणुक करणा-या एका दलाल इसमास सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे कडुन अटक

पुणे शहरात रहिवाशी असलेले महिलांच्या अज्ञानपणाचा व गरिबीचा फायदा घेवुन मुंबई येथील एंजट यांनी फसवणुक करून स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी त्यांचा टुरिस्ट व्हिजा काढुन त्या टुरिस्ट व्हिजावर पिडीत महिलांना घर कामासाठी जास्त पगाराचे अमिष दाखवुन सौदी अरेबीया देशात पाठवुन त्यांचे बदल्यात तेथील घरमालका कडुन एजंट यांनी मोठी रक्कम घेवुन त्या महिलांना दरमहा ठरले पगारा पेक्षा कमी रक्कम घेतली व तेथील घर मालकाने त्यांना गुलामा सारखी वागणुक दिली व त्या पिडीत महिलांनी भारत देशात परत येण्यासाठी भारतातील एजंट इसमांना विनंती करून देखील एजंट लोकानी पिडीत महिलाकडे भारतात परत येण्यासाठी त्यांच्याकडे पैशाची मागणी करून पिडीत महिलांची फसवणुक केली म्हणुन मार्केट यार्ड पोलीस स्टेशन गुरनं.२२४/२०२३ भादवि ३७०,४२०,३८५,५०६,३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाचे गार्भिय लक्षात घेवुन गुन्हयातील आरोपी यांना अटक करण्याबाबत मा.वरीष्ठांनी आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे पथकाने मुंबई माहिम येथे आरोपीचा शोध घेतला असता आरोपी नामे याहया याचे पुर्ण नाव व पत्ता महित नसताना देखील शिताफीने माहिम मुंबई येथे कसोशिने शोधु घेवुन एक एजंट यास ताब्यात घेवुन पुढील तपासाकरीता मार्केट यार्ड पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले असुन मा.न्यायालयाने आरोपीस सहा दिवसाची पोलीस कोठडी रिमांड दिली आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे पुणे शहर श्री.अमोल झेंडे, यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.भरत जाधव तसेच, सपोनि राजेश माळेगावे,पोलीस अंमलदार राजेंद्र कुमावत,मनिषा पुकाळे,तुषार भिवरकर,अमित जमदाडे या पथकाने यशस्वी केली आहे.